




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२४ ●गुरूवार, दि.१३ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# 'महायुती विजयी झाली पाहिजे'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकर्त्यांना सूचना

**मुंबई । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा धुरळा उडायला आता खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. सर्वात मोठा पक्ष असलेला भाजप हा कायम निवडणुकीसाठी तयार असतो. आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच मिनी विधानसभा निवडणुकीत भाजपाला क्रमांक एकचा पक्ष करण्याचा जोरदार प्रयत्न करा. महायुतीच विजयी झाली पाहिजे, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केली. आगामी स्थानिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी ही सूचना केली. आगामी निवडणुकीत नंबर वनचा पक्ष हा भाजपा राहिला पाहिजे, या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्ठा करा. महाविकास आघाडी आपला क्रमांक एकचा विरोधक आहे, हे लक्षात ठेवा. मित्रपक्षांना कुठेही दुखावू नका. स्थानिक पातळीवर कुठे समन्वय होत नसेल तर वरिष्ठ नेत्यांना सांगा, पण मित्रपक्षांच्या नेत्यांवर टीका करण्याचे टाळा. महायुती जिंकली पाहिजे, यासाठी सर्व जिल्हा प्रभारी आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जीव तोडून काम करावे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

निवडणूक प्रभारी म्हणून चंद्रशेखर बावनकुळे यांची निवड भाजपच्या निरीक्षकांनी नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी जी संभाव्य नावे प्रदेश भाजपकडे पाठविली असतील त्यातीलच एकाला संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशाप्रकारे संघटनेच्या माध्यमातून आलेल्या नावांवर शिक्कामोर्तब करण्याची भूमिका भाजपने घेतली आहे. निवडणूक प्रभारी म्हणून चंद्रशेखर ▶▶ उर्वरित पान २ वर

# दिल्ली स्फोटाचे कनेक्शन उघड; जैशसाठी काम करणाऱ्या डॉक्टर महिलेच्या कसून तपासानंतर...

**वृत्तसंस्था**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटामुळे संपूर्ण देश हादरला असून त्यासंदर्भात आत नवनवे अपडेट्स समोर येत आहेत. दरम्यान दिल्ली स्फोटाचे कनेक्शन हे फरिदाबाद मॉड्यूलशी जोडलेले असल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी हरियाणा ते लखनऊ येथे केलेल्या ऑपरेशनमध्ये त्याचा पर्दाफाश केला होता. या कारवाईमध्ये फरीदाबादमधून डॉक्टर जम्मिल शकील आणि लखनऊमधून डॉक्टर महिला शाहीना शाहिद हिला बेड्या ठोकण्यात आल्या होत्या.

मात्र आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार डॉक्टर शाहीना शाहिद ही काही साधीसुधी डॉक्टर नव्हे तर ती जैश-ए-मोहम्मदच्या महिला शाखेच्या




जमात उल मोमिनतची कमांडर होती. सूत्रांच्या सांगण्यानुसार, या संघटनेची पाकिस्तानमधील प्रमुख म्हणजे सादिया अजहर आहे, जी दशहतवादी मसूद अझहरची बहीण आणइ कंधार हायजॅक केसचा मास्टरमाईंड यूसूफ अजहरची पत्नी आहे. म्हणजेच फरीदाबादमधून अटक करण्यात आलेली डॉक्टर थेट जैश-ए-मोहम्मदच्या दहशतावाद्यांशी कनेक्टेड होती. दिल्लीत झालेला बॉम्बस्फोट हा या नेटवर्कचा ▶ उर्वरित पान २ वर

# TET बाबत फेरविचार याचिका नकोच! सर्वोच्च न्यायालयात जाण्याबाबत राज्य प्रतिकूल

**मुंबई । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपरिषद तसेच अनुदानित, अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयाविरोधात अनेक शिक्षक संघटनांसह काही राज्यांनी फेरविचार याचिका दाखल केली



असली, तरी महाराष्ट्र राज्य अशी याचिका दाखल करण्याबाबत अनुकूल नाही. फेरविचार याचिकेमुळे सर्वोच्च न्यायालय निर्णय बदलणार नाही. त्यासाठी केंद्रातूनच कायद्यात बदल होणे गरजेचे आहे, असे सांगत राज्य सरकारने केंद्रीय शिक्षण मंत्रालय व राष्ट्रीय तंत्रशिक्षण परिषद यांच्यासोबत टीईटी सक्तीविरोधात पत्रव्यवहार केला आहे. अनेक शिक्षक संघटनांनीही विनंतीपत्रे पाठवत कायद्यात बदल करण्याची मागणी केली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच अनुदानित, अंशतः अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये गोरक्षकाला महामार्ग पोलिस अधिकाऱ्याकडून बेदम मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारे वाहन तपासण्यास सांगणाऱ्या गोरक्षकाला पाडळशिंगी एका टोल नाक्यावर महामार्ग पोलिसांनी बेदम मारहाण केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. मारहाणीत जखमी झालेल्या गोरक्षकावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे जनतेचे रक्षकच भक्षक बनत असल्याचा संताप



व्यक्त होत असून, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोरक्षक पाळवदे यांना बार्शी रस्त्यावरून गेवराईकडे जनावरे घेऊन एक पिकअप वाहन जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यांनी तातडीने या वाहनाचा पाठलाग सुरू केला.पाठलाग करताना हे वाहन बीड बायपास मार्गे सुसाट वेगाने पाडळशिंगी टोल नाक्याच्या दिशेने निघाले. गोरक्षकांनी त्वरीत पाडळशिंगी टोल नाक्यावर उपस्थित असलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

# आतली बातमी ! शिंदे VS ठाकरे, सुप्रीम कोर्टात काय-काय घडलं?

**वृत्तसंस्था**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यावर पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हाच्या वादावरील अंतिम सुनावणी आता पुढच्याच वर्षी होणार आहे. या प्रकरणात २१ जानेवारी २०२६ रोजी पुढील सुनावणी घेतली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले. त्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अशाच मुद्यावरील




सुनावणीही घेतली जाईल. ही सुनावणी दुसऱ्या दिवशीही (२२ जानेवारी) चालू राहील असे न्या. सूर्यकांत यांनी तोंडी सांगितले. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी याबाबत सुनावणी घ्यावी अशी उबाठा पक्षाने मागणी केली होती. मात्र ती मान्य झाली नाही.

एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता देण्याच्या आणि त्यांना 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह बहाल करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका उबाठा पक्षाने ▶ उर्वरित पान २ वर

# मुली आणि महिलांवर तंत्रविधी, मानवी कवट्या आणि पुन्हा वशीकरण.. कोल्हापुरात 'चुटकीवाला बाबा'मुळे खळबळ

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात पुरोगामी विचारांसाठी ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापुरात पुन्हा एकदा अंधविश्वासाचे सावट गडद झाले आहे. कोल्हापूरच्या टिंबर मार्केट परिसरातील 'चुटकीवाला बाबा' नावाच्या तथाकथित बाबाचे व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल होऊ लागले लागले आहेत. त्यातील अघोरी प्रयोगांमुळे नागरिकांमध्ये संताप



उसळला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या बाबाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केल्यानंतर पोलीस यंत्रणा देखील या बाबाचा ठावठिकाणा शोधून काढण्याच्या ▶ उर्वरित पान २ वर

# मुंबई क्रिकेट असोसिएशन उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाड, तर सचिवपदी उन्मेष खानविलकर; अजिंक्य नाईक गटाला १२ जागा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई क्रिकेट असोसिएशन उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली आहे. आव्हाडांनी नवीन शेट्टी यांचा ४८ मतांनी पराभव केला. तर सचिव पदावर उन्मेष खानविलकर यांनी विजय मिळवला असून त्यांनी शाह आलम शेख यांचा पराभव केला. संयुक्त सचिव म्हणून निलेश भोसले यांची निवड झाली असून त्यांनी गौरव पय्याडे यांचा पराभव केला. एमसीएच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची या आधीच बिनविरोध



निवड करण्यात आली आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत एकूण ३६२ जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

मुंबई क्रिकेट असोसिएशनचा निकाल - उपाध्यक्ष - जितेंद्र आव्हाड २०३ विजयी वि. नवीन शेट्टी १५५, ▶ उर्वरित पान २ वर

# दिल्ली स्फोटानंतर मोदी सरकारचा मोठा निर्णय; कॅबिनेटच्या बैठकीत महत्त्वाचा प्रस्ताव मंजूर

**वृत्तसंस्था**

केंद्र सरकारनं दिल्ली स्फोटाबद्दल महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाल किल्ल्याजवळ झालेला स्फोट दहशतवादी हल्ला मानण्यात आला आहे. कारमध्ये



झालेला स्फोट अतिशय गंभीर दहशतवादी घटना असल्याचं सरकारनं म्हटलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत कॅबिनेटची बैठक झाली. त्यात दिल्ली बॉम्ब स्फोटाबद्दल एक प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

१० नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात एका कारमध्ये झालेला स्फोट दहशतवादी घटना असल्याचं म्हणत केंद्रीय मंत्रिमंडळानं याबद्दल शोक व्यक्त केला. हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या स्मरणार्थ दोन मिनिटं मौन पाळण्यात आलं. मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी एक महत्त्वाचा प्रस्ताव ठेवण्यात आला. दहशतवाद्यांच्या सगळ्या स्वरुपांसंदर्भात भारताचं धोरण शून्य सहिष्णूतेचं असेल, असा उल्लेख प्रस्तावात आहे. दिल्ली स्फोटाचा तपास अतिशय वेगानं करण्यात यावा, असे आदेश मंत्रिमंडळातून देण्यात आल्याचा उल्लेख प्रस्तावात आहे. 'स्फोटामागे असलेले गुन्हेगार, त्यांचे सहकारी आणि त्यांचे पुरस्कर्ते यांची ओळख पटवण्यात यावी. त्यांना त्वरित ▶ उर्वरित पान २ वर

# इंदापूरमध्ये आढळला पुरुषाच्या पायाचा तोडलेल्या अवस्थेतील भाग



**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या इंदापूर तालुक्यातील कळंब निमसाखर मार्गावर कळंब गावच्या हद्दीत ही घटना घडली आहे. एका हॉटेलपासून ५०० ते ७०० मीटर अंतरावर माणसाच्या डाव्या पायाचा अर्धा भाग आढळून आलाय.आज सकाळच्या सुमाराची घटना उघडकीस आली आणि यानंतर एकच खळबळ उडाली आहे. याची माहिती वालचंदनगर पोलीस ठाण्याला मिळताच पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे हे घटनास्थळी दाखल झाले असून या प्रकरणाचा अधिक तपास केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार ▶ उर्वरित पान २ वर

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांचे बोर्ड शासनाची दिशाभूल करणारे

## अभियंता यांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष ग्रामस्थांच्या मुळावर : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांची पारदर्शकता आणि दर्जा राखण्यासाठी शासनाने ठरवलेल्या नियमांनुसार माहितीफलकावर योजनेचे नाव, कामाचा प्रकार (नवीन रस्ता की सुधारणा), रस्ता कोणत्या दोन ठिकाणांना जोडतो, कामाची अंदाजित किंमत, निधी देणारी संस्था (महाराष्ट्र शासन), कामाची सुरुवात आणि पूर्ण होण्याची तारीख, तसेच संबंधित



अभियंता व कंत्राटदारांची माहिती नमूद करणे बंधनकारक असते. यामुळे ग्रामस्थांना रस्त्याच्या देखभाल कालावधीबाबत आणि कामाच्या गुणवत्तेबाबत स्पष्ट माहिती मिळते. परंतु बीड जिल्ह्यात या नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या अनेक रस्त्यांवर माहितीफलकावरील दिनांक आणि वास्तव कामामध्ये तफावत दिसते.

काही ठिकाणी काम सुरू झाल्याची तारीख दोन वर्षांपूर्वीची आणि पूर्ण झाल्याची तारीख वर्षभरापूर्वीची दाखवण्यात आली आहे, तर प्रत्यक्षात सध्या त्या रस्त्यांचे ▶ उर्वरित पान २ वर




# दयाळूपणा : मानवी अस्तित्वाचा जिवंत आधार

मानवी जीवनाची मूलभूत रचना ही परस्परावलंबनावर आधारलेली आहे. आपण एकमेकांशिवाय जगू शकत नाही ही वस्तुस्थिती जशी खगोलशास्त्रीय तत्त्वांनी सिद्ध होते, तशीच ती समाजशास्त्रीय आणि मनोवैज्ञानिक अभ्यासांतही सिद्ध होते. माणूस हा सामाजिक प्राणी आहे ही परिभाषा केवळ पाठ्यपुस्तकातील ओळ म्हणून आपण स्वीकारली असली तरी या वाक्यातील 'सामाजिक' या शब्दाच्या मागे दडलेले सर्वांत संवेदनशील, सुक्ष्म आणि गहीरे तत्त्व म्हणजेच दयाळूपणा होय. याच भावनेची जाणीव तेव्हा आणखी स्पष्ट होते, जेव्हा आपण १३ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा 'जागतिक दयाळूपणा दिवस' साजरा करतो. या दिवसाचे औचित्य आपल्याला केवळ एखादी औपचारिक स्मृती नव्हे, तर मानवी सभ्यतेच्या मूळ आत्म्याची पुनश्च आठवण करून देते. दयाळूपणा हा कोणत्याही अर्थाने केवळ दान करणे, मदत देणे, सहानुभूती व्यक्त करणे एवढ्यावर मर्यादित न राहता, हा माणसाच्या व्यक्तिमत्वाचा, विचारप्रणालीचा आणि सामाजिक व्यवहार संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे. इतिहासाच्या पृष्ठांवर नजर टाकली तर जगातील सर्व धर्म, तत्त्वज्ञान, समाजव्यवस्था आणि क्रांतिकारक विचारधारा 'दयाळूपणाला' मानवी जीवनाच्या अविभाज्य घटकाच्या रूपाने मांडताना दिसतात. गौतम बुद्धांच्या करुणावादापासून महावीरांच्या अहिंसेपर्यंत, सूफी संतांच्या प्रेमसंवादापासून संत तुकारामांच्या वारकरी भावपरंपरेपर्यंत, गांधीजींच्या 'अहिंसा आणि सत्य' तत्त्वज्ञानापासून ते आधुनिक काळातील मानवतावादी चळवळीपर्यंत सर्वांनी दयाळूपणाला मानवी प्रगतीचे मूळ स्वरूप मानले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर दयाळूपणा ही मानवी संबंधांची बंधरचना दृढ करणारी अदृश्य साखळी आहे. कुठलीही संस्कृती परस्परांतील विश्वास, आदर आणि सहजीवन यांवर उभी असते. आणि या तिन्ही मूल्यांच्या पायावर दयाळूपणाचा कौल असणे आवश्यक असते. दयाळूपणा नसलेली व्यक्ती केवळ भौतिकदृष्ट्या यशस्वी होऊ शकते, परंतु मानवी अर्थाने ती परिपूर्ण होत नाही. असे असताना आजच्या जागतिकीकरणाच्या, यांत्रिकीकरणाच्या, तंत्रज्ञानाधारित वेगवान जीवनशैलीने मानवी संवाद अधिकाधिक डिजिटल केला आहे. संदेश, अभिवादन, चिंता, जवळीक यांना भौतिक स्वरूपापेक्षा डिजिटल स्वरूप प्राप्त झाले. भावनांची देवाणघेवाण ही प्रत्यक्ष संवादातून न होता आभासी माध्यमांद्वारे व्हायला लागली. या प्रक्रियेत एक महत्त्वाची गोष्ट हरवू लागली ती म्हणजे भावनिक जवळीक होय. जवळीक कमी झाल्यावर हळूहळू करुणा कमी होते, करुणा कमी झाली की दयाळूपणा कमी होतो. एखाद्याचे दुःख पाहणे, त्याच्या डोळ्यांतील पाणी ओळखणे, त्याच्या आवाजातील वेदनेचा सूर जाणवणे ही क्षमता कमकुवत होऊ लागली. समाजशास्त्र सांगते की जेव्हा समाजाची भावनिक संवेदनशीलता घटते तेव्हा समाजात स्वार्थ, भेदभाव, विभाजन, असहिष्णुता, हिंसा आणि तणाव वाढू लागतात. आणि हेच आपण जगभरात विविध स्वरूपांत पाहू लागलो आहोत. आजचे जग भांडवलशाहीच्या स्पर्धात्मक मूल्यांनी व्यापलेले आहे. इतरांपेक्षा पुढे जाणे, अधिकाधिक मिळवणे, यशाचे मोजमाप आर्थिक आणि भौतिक निकषांनी करणे आणि त्यामध्ये मानवी संबंध आणि भावनिक मूल्यांकडे दुर्लक्ष करणे हा प्रवाह वाढतो आहे. समाजशास्त्रीय भाषेत याला 'मानवीकरणाचा क्षय' (ऊशहीीरपळूरींळेप) म्हणतात. ज्या समाजात दयाळूपणाचा अभाव वाढतो त्या समाजात व्यक्तींची ओळख त्यांच्या हक्कांपेक्षा कर्तव्यांच्या मर्यादेत, संबंधांपेक्षा व्यवहारांमध्ये, भावना पेक्षा तर्कांच्या कोरडेपणात अडकू लागते. आणि अशावेळी दयाळूपणा हा केवळ नैतिक मूल्य नसून समाजाच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग बनतो. कारण दयाळूपणाचे एक विलक्षण वैशिष्ट्ये म्हणजे तो 'वाटला' की कमी न होता अधिक वाढतो.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

## पुढे जायचे असेल तर स्वत:ला बदला, दुसरे बदलतीलच असे नाही...

एकदा पाळीव प्राण्यांच्या राज्यात सिंहसनासाठी धावण्याची स्पर्धा आयोजित केली जाते,ही स्पर्धा जो जिंकेल तो या सिंहसनाचा राजा असेल. एक गाढव आणि कुत्रा मित्र असतात दोघांमध्ये चर्चा होऊन धावण्याच्या शर्यतीत भाग घेण्याचे ठरते,कुत्रा खुप खुश होता मनातून म्हणतो की गाढवाला हरवणे माझ्यासाठी फार कठीण नाही.मी ही शर्यत आरामात जिंकणार.शर्यत सुरू होते गाढव जोरात पळत असतो तसाच कुत्रा पण खुप वेगाने धावू लागतो,त्या कुत्र्याला कुठे माहीत की प्रत्येक चौकात त्याला विरोध करणारे त्याचेच आपले बसले आहेत.प्रत्येक चौकात त्याच्या कुळातले रिकामे कुत्रे बसलेले असतात ते त्याचा पाठलाग जरून पुढे जाण्यापासून थांबवतात,त्याच्यावर हल्ला करतात,त्याला विरोध झाला,प्रत्येक चौकात हे घडत असते,बिचारा कुत्रा क्षमता असून पण अपेक्षित ध्येयापर्यंत पोहोचण्यात असफल होतो,जाऊन पाहतो तर गाढव सिंहासनावर विराजमान झालेलं आहे.



याचा अर्थ असा आहे आपण जेव्हा पुढे जाण्याचा प्रयत्न करू तेंव्हा तेंव्हा आपल्याच जवळचे आपला पाय खेचतील. तुम्ही मात्र ठाम राहा, नाहीतर आहेतच आपल्यावर राज्य करणारे गाढव समाजात.

**(लेखक–श्री.सुभाष राठोड, हे शिक्षक असून महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम संशोधन व पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ इतिहास व नागरिकशास्त्र(बालभारती)विषय समिती सदस्य आहेत.)**

◆ पान १ वरून पुढे...

### 'महायुती विजयी...

बावनकुळे यांची निवड जाहीर करण्यात आली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत ही बैठक आयोजित करण्यात आली होती. तर महायुतीच्या माध्यमातून दोन–तृतीयांश बहुमताने महाराष्ट्राच्या सर्व निवडणुका जिंकू, असा विश्वास यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. शक्यतो महायुतीच व्हायला हवी, अशी भूमिका घेत तीन पक्षांच्या समन्वय समितीने बेठकीत एक रणनीती निश्चित केली. त्यानुसार स्थानिक पालकमंत्री आणि अन्य दोन पक्षांचे संपर्क मंत्री अशा तिघांची समिती प्रत्येक जिल्ह्यात येत्या दोन–तीन दिवसांत जाऊन महायुतीने एकत्रितपणे लढावे यासाठी प्रयत्न करेल. सूत्रांनी सांगितले की, समन्वय समितीच्या बेठकीत रिदिसेनेच्या मंत्र्यांनी ठाणे– कोकणात भाजपचे स्थानिक नेते शिंदेसेनेवर उघडपणे टीका करीत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, जिल्हा प्रभारींनी महायुतीवर जास्तीत जास्त भर द्यावा, तसेच मित्रपक्षांवर टीकाटिप्पणी करू नये, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या. महायुतीत समन्वय टिकवण्यासाठी प्रयत्न केले जातील. या समन्वयासाठी प्रत्येक जिल्ह्यात तीन मंत्र्यांची समिती असेल. यामध्ये भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीचे प्रत्येकी एक असे तीन मंत्री समन्वयक असतील, असे बावनकुळे म्हणाले.

### दिल्ली स्फोटाचे...

पुढचा दुवा होता का हे आता एजन्सी हे शोधण्याचा प्रयत्न करत आहे.
काल म्हणजेच १० नोव्हेंबर, सोमवारी संध्याकाळी ६ वाजून ५२ मिनिटांनी वाजता दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ एका चालत्या कारमध्ये स्फोट झाला. यात नऊ जणांचा मृत्यू झाला. मात्र या स्फोटापूर्वीचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे, ज्यामध्ये एक पांढऱ्या रंगाची आय–२० कार पार्किंगमधून बाहेर पडताना दिसत आहे. त्यानंतर अवघ्या ४ मिनिटांत हा स्फोट झाला. या कारमध्येच दहशतवादी डॉ. मोहम्मद उमर होता अशी शंका व्यक्त केली जात आहे. उमर हा फरिदाबाद मॉड्यूलचा भाग असू शकतो असे पोलिसांचे म्हणणे आहे. अलिकडेच, जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी हरियाणातील फरिदाबाद ते लखनऊ मोठी कारवाई करत २९०० किलो स्फोटके (संशयित अमोनियम नायट्रेट) जप्त केली. या कारवाईअंतर्गत, फरीदाबाद येथील डॉ. मुझम्मिल शकील आणि लखनऊ येथील महिला डॉक्टर शाहीन शाहिद यांना अटक करण्यात आली.
लखनऊ कनेक्शनने वाढवली चिंता
तपासात असेही आढळून आले की अटक करण्यात आलेल्या शाहीनाचे लखनौशी जुने कौटुंबिक संबंध होते. तिचे आजी–आजोबा लालबाग परिसरात राहत होते आणि ती लहानपणी अनेक वेळा लखनौला आली होती. जरी या लिंकची अधिकृतपणे पुष्टी झालेली नसली तरी, उत्तर प्रदेश पोलिसांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.
एमबीबीएस स्टुडंटने केली पोलखोल– स्पेशल टास्क फोर्सने (STF) ३० ऑक्टोबर रोजी फरिदाबादच्या धौज परिसरातून अल–फलाह विद्यापीठातील एमबीबीएसचा विद्यार्थी डॉ. मुझमिल अहमद याला अटक केली, तेव्हा संपूर्ण कट उघडकीस आला. त्याच्या घरातून मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त करण्यात आली. चौकशीदरम्यान मुझमिलने शाहिना शाहिदचे नाव घेतले. जेव्हा तिच्या आलिशान कारमध्ये –घ–४७ रायफल आणि अनेक मॅगझिन सापडल्या तेव्हा पोलिसांनाही धक्का बसला. कारण कारची नंबर प्लेट डॉ. शाहिना यांच्या नावावर होती. शाहिना एका प्रतिष्ठित रुग्णालयात प्रॅक्टिस करत होती, ज्यामुळे तिच्यावर कोणालाही संशय आला नाही. आता एजन्सीकडून तिचे कॉल डिटेल्स, बँक ट्रान्झॅक्शन आणि सोशळल मीडिया चॅट्स तपासली जात आहेत.

### TET बाबत....

◆ पान १ वरून पुढे...

अनिवार्य असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर देशभरातील विविध राज्यांमधील शिक्षक संघटना आक्रमक झाल्या. या निकालामुळे राज्यभरातील सुमारे दीड लाख शिक्षकांना ही परीक्षा द्यावी लागणार आहे. यापैकी अनेक शिक्षक निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. शिक्षण हक्क कायदा २००९–१० मध्ये लागू झाला. या कायद्यात या परीक्षेबाबतचे कलम आहे. मात्र, ही परीक्षा कायदा लागू झाल्यानंतर सेवेत येणाऱ्या शिक्षकांसाठीच घ्यावी, असे कुठेही नमूद नसल्याने २००९–१० च्या आधीपासून काम करणाऱ्या आणि टीईटी न दिलेल्या शिक्षकांना ही परीक्षा बंधनकारक करण्यात आली.

### बीडमध्ये गोरक्षकाला....

महामार्ग पोलिसांशी संपर्क साधला आणि संशयित वाहनात कत्तलीसाठी जनावरे जात असल्याचा संशय व्यक्त करत ते वाहन अडवून तपासणी करण्याची विनंती केली.
व्हिडिओ काढल्याने वाढला वाद– पोलिसांनी गोरक्षकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करत संशयित वाहन सोडण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे वाद निर्माण झाला. हा प्रकार पाहता गोरक्षकांनी घटनेचा व्हिडिओ काढण्यास सुरुवात केली. याच गोष्टीचा राग आल्याने, पोलीस अधिकारी मुंडे आणि त्यांच्यासोबत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी गोरक्षकाला भर टोल नाक्यावर मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाण केल्यानंतर या कर्मचाऱ्यांनी गोरक्षकाला टोल नाक्यावरील पोलिस चौकी वरच्या मजल्यावर घेऊन जात दोघांना बेदम मारहाण केली. एवढच नव्हे तर, त्याचा मोबाईल हिसकावून त्यामधील काढलेले व्हिडिओ डेटाही डिलीट करण्यात आला. गोरक्षकावरच गुन्हा दाखल करण्याची धमकी !
या धक्कादायक घटनेनंतर पोलिसांनी पीडित गोरक्षकावर कोणतीही कारवाई न करता त्याला ग्रामीण पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांच्या दबावामुळे गोरक्षकाने अद्याप तक्रार दाखल केलेली नाही. तसेच, गोरक्षकावर खंडणीचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देखील देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.
जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू कारवाईची मागणी– सध्या जखमी गोरक्षक पाळवदे हे जिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहेत. गोरक्षक संघटनेने या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला असून, पोलिस अधीक्षक यांनी तातडीने पाडळशिंगी टोल नाक्यावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करावी आणि मारहाण करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. जनतेचे रक्षकच जर असे भक्षक बनत असतील, तर न्याय कोणाकडे मागायचा, असा संतप्त सवाल गोरक्षकांनी उपस्थित केला आहे.

### आतली बातमी...

दाखल केली आहे. गेली ३ वर्षे त्यावर सुनावणी सुरू आहे. त्याची सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर झाली. शिवसेनेच्या प्रकरणाबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार गटाला पक्षाचे अधिकृत निवडणूक चिन्ह देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुद्ध शरद पवार गटाने दाखल केलेल्या याचिकेवरही पुढील सुनावणीत विचार करण्यासही खंडपीठाने सहमती दर्शविली.
या दोन्ही प्रकरणांमधील कायदेशीर मुद्दे समान आणि एकमेकांवर अवलंबून असल्याचे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेण्यास सहमती दर्शविली. २१ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता या प्रकरणाची सुनावणी घेण्यात येईल, असे खंडपीठाने सांगितले. गरज पडल्यास सुनावणी दुसऱ्या दिवशीही सुरू राहू शकेल. यासाठी २२ जानेवारी रोजीही कोणतेही महत्त्वाचे प्रकरण पोस्ट करू नये, असे आदेश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी न्यायालयाच्या प्रमुखांना दिले.

◆ पान १ वरून पुढे...

आजच्या काही मिनिटांच्या सुनावणीत उबाठा पक्षाकडून अभिषेक मनु सिंघवी आणि देवदत्त कामत यांनी तर शिवसेनेच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि एन के कौल यांनी हजेरी लावली. उबाठा पक्षाच्या याचिकेत निवडणूक आयोगाच्या फेब्रुवारी २०२३ च्या त्या आदेशाला आव्हान देण्यात आले आहे, ज्यात २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्ह शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला बहाल केले होते. ठाकरे यांच्या गटाने असा युक्तिवाद केला आहे की, निवडणूक आयोगाने संघटनात्मक रचनेत पक्षाच्या बहुमताची खरी कसोटी विचारात न घेता त्याऐवजी निवडून आलेल्या आमदारांमध्ये शिंदे गटाच्या ताकदीला अवाजवी महत्त्व दिले. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात नोटीस बजावताना उबाठा पक्षाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हे नाव आणि ज्वलंत मशाल हे चिन्ह कायम ठेवण्याची परवानगी दिली होती. त्याचप्रमाणे न्यायालयाने शरद पवार गटाला तुतारी फुंकणारा माणूस हे चिन्ह वापरण्याची परवानगी देणारी अंतरिम व्यवस्था केली होती आणि अजित पवार गटाला घड्याळ चिन्हाचा वापर करताना, हे न्यायप्रविष्ट प्रकरण आहे हे ठळकपणे प्रसिद्ध करण्यास सांगितले होते.

### मुली आणि महिलांवर...

कामाला लागली आहे.
करणी, वशीकरणाचे व्हिडीओ व्हायरल– 'चुटकीवाला बाबा'चे सहा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहेत. एका व्हिडिओत तो जमिनीवर बसलेल्या व्यक्तीच्या कपाळावर हात ठेवून काही मंत्रोच्चार करताना दिसतो; दुसऱ्यात मानवी कवटीचा आधार घेत काही विधी करत असल्याची दृष्ये आहेत. तिसऱ्या आणि चौथ्या व्हिडिओत तो स्त्रिया आणि तरुणींवर चिमट्यासारख्या साधनाने स्पर्श करत अघोरी तंत्रविधी करतो आहे. एका दृश्यात त्रिशूल हातात घेऊन काही जप करताना दिसतो. तसेच या व्हिडिओंनी कोल्हापुरात आणि परिसरात खळबळ उडाली आहे.
कठोर कारवाईची अंनिसची मागणी– अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या गीता हसुरकर यांनी सांगितले की, अशा भोंदू बाबांचा प्रभाव निरपराध मुलं, महिला आणि सामान्य नागरिकांवर पडतो. त्यांच्या मानसिक तसेच आर्थिक शोषणाचा हा प्रकार असून याविरोधात कडक कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. नागरिकांनी अशा भोंदूगिरीपासून दूर राहून संशयास्पद बाबी तात्काळ पोलिसांना किंवा समितीला कळवाव्यात, असे त्यांनी आवाहन केले आहे.
पोलीस घेत आहेत बाबाचा शोध– दरम्यान, जुना राजवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजीवकुमार झाडे यांनी सांगितले की, या प्रकरणी अद्याप कोणतीही औपचारिक तक्रार आली नसली, तरी व्हिडिओंच्या आधारे चौकशी सुरू केली आहे. सध्या तो बाबा कोल्हापूरबाहेर असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून लवकरच त्याचा नवा ठावठिकाणा शोधला जाईल. तसेच या बाबाने कुणाची जर आर्थिक किंवा अन्य फसवणूक केली असेल तर पुढे येऊन याबाबत नागरिकांनी पोलिसांना कळवावे, असे आवाहन देखील झाडे यांनी केले आहे.

### मुंबई क्रिकेट....

सचिव – उन्मेष खानविलकर २२७ विजयी वि. शाह आलम शेख १२९, संयुक्त सचिव – निलेश भोसले २२८ विजयी वि. गौरव पय्याडे १२८, खजिनदार – अरमान मलिक २३७ विजयी वि. सुरेंद्र शेवाळे ११९
मुंबई टी२० गव्हर्निंग कौन्सिल मेंबर– भरत किणी १८४ विजयी वि. किशोर जैन; पेक्स कौन्सिल (नऊ विजयी उमेदवार आणि मतं)– कदम विघ्नेश– २४२, नदीम मेमन– १९८, मिलिंद नार्वेकर– २४२, भूषण पाटील– २०८, विकास रेपाळे– १८५, सूरज समत– २४६, सावंत नील– १७८, संदीप

◆ पान १ वरून पुढे...

विचारे– २४७, प्रमोद यादव– १८६

### दिल्ली स्फोटानंतर...

न्यायाच्या चौकटीत आणावं. त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करावं. सरकार सर्व परिस्थितीवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवून आहे,' असं प्रस्तावात नमूद करण्यात आलं आहे. सोमवारी संध्याकाळी सातच्या सुमारास लाल किल्ला मेट्रो स्थानकाच्या जवळ एका हुंडाई आय २० कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटानंतर आसपासच्या वाहनांनादेखील आग लागली. या स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला, तर २० पेक्षा अधिक जण जखमी झाले. सरकारनं बॉम्ब स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएकडे सोपवला आहे.
केंद्रीय गृह मंत्री अमित शहांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय बैठक बोलावण्यात आली होती. त्यात बडे अधिकारी सहभागी झाले होते. दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटाच्या तपासाची जबाबदारी एनआयएकडे सोपवण्याचा निर्णय बैठकीत झाला. आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी लोक नायक रुग्णालयात गेले होते. तिथे जाऊन त्यांनी स्फोटात जखमी झालेल्यांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. यानंतर रात्री कॅबिनेटची बैठक झाली. दिल्लीतील स्फोटानंतर झालेली कॅबिनेटची ही पहिलीच बैठक आहे.

### इंदापूरमध्ये आढळला...

हा पायाचा भाग पुरुष जातीचा असून तो डाव्या बाजूच्या पायाचा आहे डाव्या बाजूच्या पायाचा गुडघ्यापासून खालील हा भाग असून तो वाहतुकीच्या रस्त्यावर पडलेला होता. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.वालचंदनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे घटनास्थळी दाखल झाले असून या प्रकाराचा आता पोलीस सखोल तपास करत आहेत.
पोलिसांनी पाय तोडलेल्या आणि सॉक्स घातलेल्या पायावरून ओळख पटवण्यासाठी सर्वत्र शोधमोहीम सुरू केली आहे. जर कोणाला या वर्णनानुसार काही माहिती मिळाली, तर त्यांनी वालचंदनगर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असं आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे. बारामती विभागाची फॉरेन्सिक लॅबचे कर्मचारीही घटनास्थळी दाखल झाले होते. इंदापूरचे पोलीस निरीक्षक विलास नाळे यांनीही घटनास्थळी भेट देऊन माहिती घेतली. वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे आणि त्यांचे सहकारी सकाळपासूनच या प्रकरणाचा तपास करत आहेत. हा पाय नेमका कुणाचा आहे. तसेच ही घटना नेमकी कुठे घडली? काय आहे या घटनेमागचं गूढ काय?

### मुख्यमंत्री ग्रामसडक...

काम सुरू आहे. अशा प्रकारे दुरुस्ती कालावधीत दोन वर्षांचा फरक निर्माण करून कंत्राटदार व अभियंते रस्त्याची जबाबदारी टाळतात.
रस्ता खराब झाल्यानंतर ग्रामस्थ दुरुस्तीची मागणी करतात तेव्हा कंत्राटदार म्हणतात – दुरुस्ती कालावधी संपला आहे, आता जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यामुळे शासन आणि ग्रामस्थ दोघांचीही दिशाभूल होते.
या प्रकारांबाबत सामाजिक कार्यकर्ते तसेच मुख्य प्रचार प्रमुख, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे यांनी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे लक्ष वेधून, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांनी ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामावर लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे. या योजनेचा उद्देश दुर्गम वाड्या–वस्त्यांना जोडणे आणि विद्यमान रस्त्यांची दर्जोन्नती करणे हा आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### गेवराई शहराच्या...

फसी हरभट, अश्विनी बांडे, जयश्री भापकर, रब्बू भाबी, फरवीन शेख, मुमताज शेख, शरीन शेख, जे के बाबू, सय्यद सुभान, निजाम भाई, सय्यद रफीक, नारायण पवार, अमर सय्यद, गफूर पटेल, इम्रान सय्यद, कौसर भाई, पप्पू बांडे, सय्यद सद्दाम, अस्लम शेख, सय्यद हरुन, सय्यद खाजा, शेख हादी, शेख नय्यूम, अफसर भाई यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने मतदार बांधव उपस्थित होते.

### ॲड. बापूसाहेब जाधव...

आहे. पुढे ते शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण यांचा प्रचार–प्रसार करत, शिवसेना पक्षाच्या बळकटीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करतील, असा विश्वास जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला. उपस्थिती शिवसेना पदाधिकारी तथा शिवसैनिकांनी ॲड. बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करत शिवसेना पक्षात स्वागत केले.

### शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा...

मिळणार्या लाभानुसार त्यांची वेतननिश्चिती करताना एस–४ मध्ये न करता एस–५ मध्येच करण्यात यावी. शाळेतील कर्मचार्यांना माध्यमिक राज्य शासकिय कर्मचार्यांप्रमाणेच नवीन सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षानंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा. राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने न करता पूर्वी प्रमाणे नियमित वेतनश्रेणीत करण्यात यावी, माध्यमिक शाळातील वरीष्ठ लिपीक, मुख्य लिपीक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल

◆ पान ४ वरून पुढे...

अतिरिक्त झाल्यास त्यांना सेवानिवृत्त होईपर्यंत वेतनास व वेतनश्रेणीस संरक्षण मिळावे. प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल, शिपाई यांच्या वेतनातील त्रुटी दूर करण्यात याव्यात आदि मागण्यासाठी शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे तरी या मोर्चात जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर, उपाध्यक्ष शेख मोहसिन, बाळू रगडे, संदिप वनवे, सचिव नामदेव वाघ, दत्तात्रय आघाव, बाळू सोळंके, अविनाश कळमकर आदिंनी केले आहे.

### कुत्र्यांच्या हल्ल्यात...

काळवीट ठार झाले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेने परिसरातील ग्रामस्थांत संताप व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी घटनेची माहिती मिळताच बीड वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल सांगुळे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी फोन उचलला नाही.डॉ. ढवळे यांनी सांगितले की, पूर्वीचे वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे हे अशा घटनांवर तत्काळ प्रतिसाद देत आणि कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवत. परंतु सध्याचे अधिकारी सांगुळे यांनी फोन न उचलल्याने तातडीने कार्यवाही होऊ शकली नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. यानंतर बदली होऊन गेलेले वनपाल बहिरवाळ यांच्याशी संपर्क साधल्यावर त्यांनी नव्या वनपाल विजय केदार यांचा मोबाईल क्रमांक दिला. त्यावरून डॉ. ढवळे यांनी त्यांना घटनेची माहिती देत वनविभागाने तत्काळ चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी केली. वनकर्मचारी येईपर्यंत कुत्र्यांनी काळवीटाचे लचके तोडु नये म्हणून लिंबाच्या झाडाच्या

◆ पान ४ वरून पुढे...

पानांनी झाकुन ठेवले. या घटनेच्या वेळी नेकनूर पोलिस स्टेशनचे प्रशांत क्षीरसागर, तसेच महाजनवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच विश्वंभर गिरी, विशाल घरत, संदिप घरत, ऋषिकेश घरत, शंकर घरत, सतिश घरत आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

### बीड पोलीस ....

आंभोरा चेक पोस्ट अशा विविध ठिकाणी विशेष नाकाबंदी करून मोहीम राबविण्यात आली होती. सदर कारवाई दरम्यान १३४० वाहन धारकांवर करण्यात आली असून मागील प्रलंबित दंडासह एकूण ११,०८,९५०/– चा दंड वसूल करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनात जिल्ह्यातील वाहतुक शाखेचे अधिकारी पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

### उद्योगपती सरपंच...

आहे. क–हेवडगाव येथे विविध जयंती, उत्सव, सामाजिक उपक्रम, हरिनाम सप्ताह आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेत महापंगत, अन्नदान केलेले आहे. विद्यार्थींना शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे. अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली. सरपंच गायकवाड यांच्या कार्यातून समाजाच्या प्रत्येक घटकाला स्पर्श करणारा संवेदनशील दृष्टीकोन दिसून येतो नेत्रदान शिबिरांचे आयोजन करून लोकांना जनजागृती केली. चष्मे वाटप केले. रुग्णांना स्वखर्चाने पुणे, अहिल्यानगर, मुंबई येथे नेत्रदानासाठी निवड झालेल्या शस्त्रक्रियासाठी दाखल होण्यासाठी बसभाड्याची व निवासाची सोय केली आहे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, अन्नदान, किराणा किट वाटप आणि गोरगरीबांसाठी

◆ पान ४ वरून पुढे...

आर्थिक मदत हे त्यांच्या सततच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. दिवाळी, पाडवा, जयंती प्रत्येक सणासुदीला ते जनतेसोबत असतात. सेवाभाव हा गायकवाडांचा संकल्प आहे.गेल्या २५ वर्षांपासून आ. सुरेश धस यांचे कट्टर समर्थक म्हणून परिवंत गायकवाड हे राजकीय कार्य करीत आहेत. सरपंच गायकवाड हे जनहिताला सदैव प्राधान्य देतात. त्यांच्या या निःस्वार्थ, विकासाभिमुख आणि मानवता, सेवाभावाचा गौरव म्हणून महाराष्ट्र भूषण हा मानाचा पुरस्कार गायकवाड यांना मिळाला आहे. या पुरस्काराबद्दल आ. सुरेश धस, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, माजी सभापती अरुणभैय्या निकाळजे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, शरद रेडेकर, माजी सरपंच रामशेठ मधुरकर, माजी नगरसेवक सादिक कुरेशी, डॉ. युवराज तुपे, सेवानिवृत पोलीस निरीक्षक मिलिद निकाळजे, दिलीप राऊत माजी दिपक नगरसेवक निकाळजे, रुपेश निकाळजे, राजेंद्र बोरुडे, सोमीनाथ विधाते, राजेंद्र लाड, कऱ्हेवडगाव ग्रामस्थ, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले. डीएसपी न्युज लाईव्ह चॅनलच्या वतीने सरपंच परिवंत गायकवाड यांना हा पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

### न.प. निवडणुकीतच...

दिलेल्या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात अशोक लोढा विरोधात बीएनएस कलम ११५(२), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भारती करत आहेत.दरम्यान भाजप सारख्या संस्कारक्षम पक्षाच्या शहराध्यक्षांनीच धार्मिक कार्यक्रमात असा धुडगूस घातला या बातमीनेच सर्वत्र खळबळ माजली आहे. ऐनन.प निवडणुकीची रणधुमाळी सुरू झालेली असतानाच घडलेल्या या प्रकारामुळे शहरात चर्चेला उधाण आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रशासनात ताकद

## भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांसमवेत संवाद

**मुंबई । प्रतिनिधी**

समाजातील शेवटच्या घटकाचे कल्याण हे ध्येय ठेवत त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रशासनात आहे. त्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेचा उपयोग करावा. राज्याच्या विकासगाथेला पुढे नेण्याची जबाबदारी सार्थपणे सांभाळण्याची अपेक्षा मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. प्रशासनात आलेल्या तुकडीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करत नागरिक केंद्रित व जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

२०२४ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील आठ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी वर्षा निवासस्थानी संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते. संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी विकास केंद्रित प्रशासन गरजेचे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे नागरी प्रशासनात मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी आहे.संतुलित व सर्वांगीण औद्योगिक विकासासाठी शासन १०० सुधारणा करीत आहे. या सुधारणांसाठी 'वॉर रूम' तयार करण्यात आली आहे. महसूल सुधारणांसाठी सल्लागार नेमण्यापेक्षा प्रशासनातील दांडगा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा खूप चांगला परिणाम दिसून येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. शासनाने औद्योगिक प्रयोजनासाठी राज्यामध्ये अकृषक परवाना काढण्याची मोठी सुधारणा नुकतीच केली आहे. वेळखाऊ आणि क्लिष्ट प्रक्रिया दूर करीत राज्यात गतिमान प्रशासन देण्यावर शासनाचा भर आहे. महसूल विभाग अंतर्गत बरीच प्रक्रिया, सेवा ब्लॉक चेन पद्धतीवर आणण्यात येत आहे. त्यामुळे बऱ्याच प्रक्रिया जलद व अचूक होत आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिचय करून घेतला. त्यांचा आतापर्यंतचा प्रवास, मागील अनुभव, महाराष्ट्रात काम करत असताना जाणवलेल्या चांगल्या बाबी, सुधारणा करणे गरजेचे असलेल्या बाबी याविषयीही विस्तृत संवाद साधला.

### नंदकिशोर मुंदडा यांच्या उमेदवारीचे नागरीकातून जोरदार स्वागत

## 'काकाजी' नगराध्यक्ष व्हावेत हीच सर्वसामान्य जनतेची इच्छा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी नंदकिशोर मुंदडा (काकाजी) हे उमेदवार असतील हे आता निश्चित झाले आहे. त्यांची उमेदवारी निश्चित होताच कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे.

चार दशकांहून अधिक काळ जनसेवेच्या माध्यमातून ओळख निर्माण केलेले काकाजी हे अंबाजोगाईतील प्रत्येक घराघरात परिचित नाव आहे. ४७ वर्षांच्या राजकीय प्रवासात त्यांनी कधीही व्यक्तिगत पदाचा मोह धरला नाही. घरात फक्त आमदारकीचे एकच पद, इतर सर्व पदे कार्यकर्त्यांसाठी अशी त्यांची नेहमीची भूमिका राहिली आहे. समाजकारण आणि वैयक्तिक संपर्काच्या बळावर त्यांनी प्रत्येक समाजातील सर्व घटकांना आपलेसे केले आहे. एखाद्याचे काम करताना तो आपला आहे की परका, समर्थक आहे की विरोधक असा विचार त्यांनी कधीच केला नाही. नंदकिशोर मुंदडा यांचा दांडगा जनसंपर्क ही त्यांची सर्वात मोठी ताकद आहे. रुग्णालय असो वा वीज वितरण कार्यालय, नागरिकांच्या कोणत्याही समस्येवर त्यांचा त्वरित प्रतिसाद असतो. काकाजींना फोन केला आणि काम झाले नाही असे उदाहरण नाही, असे सर्व नागरिक उत्साहाने सांगतात. सर्वांच्या अडचणींना स्वतःच्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे धावून जाणारे, २४ तास लोकांसाठी उपलब्ध असलेले हे नेतृत्व आज नागरिकांच्या मनावर राज्य करीत आहे. त्यामुळे अंबाजोगाईचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी यावेळी नंदकिशोर मुंदडा यांनी स्वतः नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवावी अशी सर्व कार्यकर्त्यांसह शहरातील अनेक नागरिकांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे त्यांची उमेदवारी जाहीर होताच सर्व कार्यकर्त्यात उत्साह आहे. तसेच सामान्य जनतेतून देखील त्यांच्या उमेदवारीचे जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे. नंदकिशोर मुंदडा यांनी मोठ्या उत्साहात प्रचार सुरु केला असून आजवरच्या हयातीत इतरांसाठी मत मागणारे काकाजी यावेळी प्रथमच स्वतः साठी मत मागत आहेत. शहरातील विविध भागांत भेटीगाठींमध्ये शेकडो नागरिक स्वतःहून उपस्थित राहून त्यांचे स्वागत करत आहेत. सर्वच ठिकाणी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून नंदकिशोर मुंदडा यांच्या रूपाने अंबाजोगाई शहराला एक अनुभवी, सुसंवादी आणि लोकाभिमुख नेतृत्व मिळणार असल्याचा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

## 'एआय' साधनांच्या स्मार्ट वापरामुळे बातमी लेखन, संशोधन आणि विश्लेषण अधिक प्रभावी: एआय तज्ज्ञ किशोर जस्मानी

**मुंबई । प्रतिनिधी**

पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साधनांचा योग्य वापर केल्यास बातमी लेखन, संशोधन आणि विश्लेषण अधिक प्रभावी करता येते, असे मत 'एआय' तज्ज्ञ किशोर जस्मानी यांनी केले.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालय येथे प्रिंट आणि डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंदर्भात प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले, त्यावेळी जस्मानी यांनी मत व्यक्त केले. 'एआय' तज्ज्ञ



किशोर जस्मानी म्हणाले की, ओपन एआय, जेमिनी आणि को-पायलट ही तीन प्रमुख एआय टूल्स पत्रकारांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. तसेच क्लॉड, डीपसिक आणि परप्लेक्सिटी ही आणखी तीन प्रभावी टूल्स आहेत. प्रत्येक टूल्सचा वापर आवश्यकतेनुसार आणि उद्दिष्टानुसार करावा. जेमिनी संशोधनासाठी विशेषतः उपयुक्त आहे, तर डीपसिक उत्तरे देण्यात अधिक प्रभावी ठरते. मात्र, मेटा एआय हे पत्रकारितेसाठी तेवढे परिणामकारक नाही, असे त्यांनी नमूद केले. किशार जस्मानी यांनी स्पष्ट केले की, बिंग, को-पायलट, गूगल बार्ड, जेमिनी आणि परप्लेक्सिटी ही साधने संशोधनासाठी, तर चॅटजीपीटी, गूगल बार्ड आणि जेमिनी ही प्रभावी लिखाणासाठी उपयुक्त आहेत. ही टूल्स समस्या सोडविणे आणि सल्ला देणे यासाठीही पत्रकारांना मदत करू शकतात. प्रत्येक 'एआय' टूल्सचा परिणाम ज्ञान, प्रॉम्प्टिंग कौशल्य आणि तर्कशक्ती या तीन घटकांवर अवलंबून असतो. प्रॉम्प्टिंगचे तीन प्रकार, शून्य शॉट, संदर्भाधारित आणि भूमिकाधारित यांचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. तसेच पत्रकारितेतील लेखन अधिक परिणामकारक करण्यासाठी ग्रामर्ली हे ॲपही उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले. 'एआय' टूल्स हस्तलिखित प्रतीवरून स्वयंचलितपणे टंकलेखन करू शकतात. पीडीएफ स्वरूपातील मजकूर चॅटजीपीटीच्या मदतीने कसा उपयोगात आणता येऊ शकतो, याचे सविस्तर मार्गदर्शनही त्यांनी केले. या प्रशिक्षण सत्रात उपस्थित पत्रकारांनी 'एआय' साधनांचा वापर करून प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे सराव केला आणि संवादात्मकपद्धतीनेमार्गदर्शनघेतले.

## अंबाजोगाई शहरातील असंख्य युवकांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील विविध प्रभागातील तरुण युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. अंबाजोगाई शहराचे विकास पुरुष माजी नगराध्यक्ष यांच्या कार्यशैलीवर प्रभावित होऊन तसेच त्यांनी अंबाजोगाई शहराचा मागील पंचवीस वर्षात केलेला विकास पाहून शहरातील युवा कार्यकर्ते अनिकेत पटाईत व युवराज पटाईत, मुनिर शहा व भीमसेन लोमटे यांच्या माध्यमातून अनेक युवकांनी जाहीर पक्षप्रवेश केला. पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार , प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण , तसेच युवा जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांच्या विचारांवर प्रेरित होऊन तसेच त्यांचेच विचार गावपातळीवर पोचवण्यासाठी अंबाजोगाई शहरातील विविध भागातून शेकडो युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. या पक्षप्रवेश सोहळ्या प्रसंगी युवा नेते तथा श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी सह अनेक जण उपस्थित होते.

अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने या सर्व युवकांनी पक्षाच्या विचारधारेवर व नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. पक्षात जाहीर प्रवेश केलेल्या युवकांची ऊर्जा व त्यांच्या कार्य तत्परतेतून पक्षाचे कार्य अधिक मजबूत व बळकट होईल असा विश्वास याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. आजचा नवयुवक हा देशाचे उद्याचे भविष्य आहे. त्यामुळे युवकांनी शिकून संघटित होऊन आपल्या समाजासाठी पर्यायाने देशासाठी कार्य करावे असे मत संकेत मोदी यांनी व्यक्त केले. पक्षप्रवेश झालेल्या सर्व युवकांचे अभिनंदन करून त्यांना आपापल्या प्रभागात पक्षाचे विचार घरोघरी पोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन देखील यावेळी राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांनी केले.

## दिवाळी बोनसच्या आडून २५ लाखांचा कथित आर्थिक गैरप्रकार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांवर चौकशीची मागणी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान/बोनस देण्याच्या नावाखाली कर्मचाऱ्यांच्या पगारातून १५ दिवसांचे वेतन कपात करून सुमारे २५ लाख रुपयांचा कथित आर्थिक गैरप्रकार करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित सचिवांवर कारवाई करण्याची मागणी बाजार समितीचे गेटमन सुलक्षण लक्ष्मण मेहेत्रे यांनी केली असून, त्यांनी याबाबत पणन संचालक, जिल्हा उपनिबंधक तसेच कोतवाली पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आहे.

- दिवाळी बोनसच्या आडून २५ लाखांचा कथित आर्थिक गैरप्रकार झाल्याचा आरोप
- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांवर चौकशीची मागणी ; बोनसच्या नावाखाली कर्मचाऱ्यांचा पगार कपात ;
- बाजार समितीच्या गेटमनची पणन संचालक, जिल्हा उपनिबंधक व कोतवाली पोलीस स्टेशनला तक्रार



सुलक्षण मेहेत्रे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांनी कर्मचाऱ्यांना दिवाळीसाठी ६५ दिवसांचे सानुग्रह अनुदान मंजूर केले. मात्र ही रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करताना किंवा केल्यानंतर प्रत्येक कर्मचाऱ्याच्या पगारातून १५ दिवसांचे वेतन कपात करून अंदाजे २५ लाख रुपये इतकी रक्कम सचिवांच्या सांगण्यावरून तीन कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा करण्यात आली. सदर रक्कम दुसऱ्याच दिवशी काढून ती सचिवांकडे जमा केल्याची चर्चा कर्मचाऱ्यांमध्ये आहे. या संदर्भात कर्मचाऱ्यांकडून सदिच्छेने वैद्यकीय मदत म्हणून पगारातील रक्कम देत आहोत असा मजकूर असलेले अर्ज दबाव टाकून लिहून घेतल्याचेही आरोप आहेत. ही बाब गंभीर आर्थिक अनियमितता असल्याने तिची तातडीने सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. बाजार समितीच्या नियमित कामकाजाचा भाग म्हणून कोणत्याही कर्मचाऱ्याचा पगार कपात करून मदत देणे वैध नाही. कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने मदत करायची असल्यास ती रोख स्वरूपात किंवा धनादेशाद्वारे पारदर्शक पद्धतीने केली जावी.

## कॉ.महंतय्या स्वामी यांचे वर्धापकाळाने निधन

**दिंद्रूड । प्रतिनिधी**



परळी तालुक्यातील मोहा येथील महाराष्ट्र विद्यालय येथील सेवानिवृत्त सहशिक्षक, कॉ.महंतय्या ल्लिकार्जुन स्वामी यांचे सोमवारी, (दि.१०रोजी) सकाळी वार्धक्याने निधन झाले. माजी खासदार कॉ. गंगाधर आप्पा बुरांडे यांचे स्वकीय म्हणून महंतय्या स्वामी सर्वश्रुत होते.सन १९९५- २०००साली ग्रामपंचायत सदस्य पदावर त्यांनी काम केले. जीवनात कॉम्रेडच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार हेच ध्येय महंतय्या स्वामी यांनी जोपासले. सोमवारी सायंकाळी चार वाजता त्यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा मंडळाचे अध्यक्ष ॲड . अजय बुरांडे यांच्यासह महाराष्ट्र विद्यालयाचे संचालकआजी-माजी सर्व शिक्षक वृंद, पंचक्रोशीतील वेगवेगळ्या राजकीय सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक व स्वामी यांचे नातेवाईक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी,तिन विवाहीत मुले, विवाहित मुली,नातवंडे,असा परिवार आहे.सेवानिवृत्त सहशिक्षक शंभूलिंग स्वामी यांचे ते बंधू होत.

## शालेय विभागीय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत सौ.के.एस.के कनिष्ठ महाविद्यालयास २ सुवर्ण तर १ रजत पदक प्राप्त

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजी नगर तसेच छत्रपती संभाजी नगर वेटलिफ्टिंग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय विभागीय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत सौ.के.एस.के कनिष्ठ महाविद्यालय,बीड येथील दोन विद्यार्थी सुवर्णपदकाचे मानकरी झाले व एक विद्यार्थी रजत पदकाचा मानकरी ठरला त्यापैकी १७ वर्षाखालील वयोगटात ६५ किलो वजना खालील गटात संदेश घेणे व १९ वर्षाखालील वयोगटात ६५



किलो वजना खालील गटात सय्यद जैद या दोघांनी सुवर्णपदकाचा मान प्राप्त करत महाविद्यालयाचे नाव उंचावले व १० ते १२ नोहेंबर २०२५ दरम्यान मनमाड येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेसाठी आपले नाव निश्चित केले तसेच बहिर शिवामनी या विद्यार्थ्याने १९ वर्षाखालील ७१ किलो खालील वजनी गटात रजत पदकाचा मान प्राप्त करत द्वितीय क्रमांक पटकावला या तिन्ही विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे हार्दिक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवानंद क्षिरसागर, उपप्राचार्य डॉ संजय पाटील, उपप्राचार्य डॉ अनिता शिंदे, पद्व्युत्तर विभाग प्रमुख डॉ खान, कमवि उपप्राचार्य डॉ नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर तसेच सर्व प्राध्यायक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले

## मोबाईल वापरकर्त्यांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी 'संचार साथी' पोर्टल आणि ॲप

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतातील १२० कोटींहून अधिक दूरध्वनी ग्राहकांच्या, विशेषतः मोबाईल वापरकर्त्यांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी दूरसंचार विभागाने संचार साथी हा नागरिक-केंद्रित उपक्रम सुरू केला आहे. मे २०२३ मध्ये सुरू झालेल्या या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे आता मोबाईल वापरकर्त्यांना त्यांच्या कनेक्शनवरील नियंत्रण, फसवणुकीपासून संरक्षण आणि सुरक्षा धोक्यांची नोंद करण्याची सुलभ व प्रभावी सुविधा उपलब्ध झाली आहे. मुंबई एलएसएच्या दूरसंचार विभागाचे संचालक विनय जांभळी आणि उपमहासंचालक (डीडीजी) सुमनेश जोशी यांनी महाराष्ट्रातील नागरिकांना सायबर सुरक्षिततेबाबत सजग राहण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी आपल्या मोबाईल डिव्हाइसवरील अनावश्यक ॲप्स तत्काळ काढून टाकावेत आणि फोन नेहमीच नवीनतम सुरक्षा पसह अपडेट ठेवणे गरजेचे आहे. नागरिकांनी दूरसंचार विभागाचे नागरिक-केंद्रित 'संचार साथी' हे ॲप डाउनलोड करून त्यातील सर्व उपयुक्त वैशिष्ट्यांचा वापर करावा.त्यामुळे फसवणूक, सायबर गुन्हे, बनावट ओळख निर्माण करणे तसेच अवांछित व्यावसायिक संदेशांवर नियंत्रण ठेवणे सोपे झाले

# माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डॉ.कपूर यांच्या निवासस्थानी घरपोच 'ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेह भेट' कार्यक्रम उत्साहात संपन्न


**बीड । प्रतिनिधी**

माऊलीम महावैष्णव संत श्री.ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'ज्ञानेश्वरी ग्रंथ घरपोच स्नेह भेट' या उपक्रमाचा एक प्रेरणादायी आणि भक्तिमय सोहळा काल दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी गोरज मुहूर्तावर दुबे कॉलनी, खंडेश्वरी रोड येथे डॉक्टर विक्रमसिंह कपूर यांच्या निवासस्थानी मोठ्या आनंदात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी कपूर कुटुंबाने ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन केले. दारात रांगोळी काढण्यात आली होती. दिव्यांची माळ आणि फुलांची आरास करून वातावरण प्रसन्न व भक्तिम झाले होते. ज्ञानदेव तुकाराम या जयघोषात आणि हरिनामाच्या गजरात छोटी दिंडी काढून ज्ञानेश्वरी ग्रंथाचे स्वागत करण्यात आले. कपूर दांपत्याने भक्तीभावाने ग्रंथाचे पूजन पूजन केले. यानंतर ह.भ.प. माधव महाराज डाके (बीड) यांच्या हस्ते ज्ञानेश्वरी ग्रंथाची विधीवत पूजा करण्यात आली. पंचारती प्रज्वलित दिव्याच्या पिवळसर



मंद प्रकशात करून श्री श्री ज्ञानेश्वरी प्रवचनाची सुरुवात झाली.

आपल्या मार्गदर्शनपर प्रवचनात ह.भ.प. माधव महाराज डाके म्हणाले की - ज्ञानेश्वरी हा नित्य आनंद देणारा ग्रंथ आहे. जो कोणी या ग्रंथाच्या सानिध्यात येतो, त्याच्या मनातील चिंता



आणि दुःख दूर होते. प्रत्यक्ष माऊली आपल्या भक्तांच्या पाठीशी उभी राहते. अडचणी, संकटे आणि भ्रम दूर करून जीवनाला नवा अर्थ देते. ज्ञानेश्वरी हा केवळ ग्रंथ नाही तर जीवनाला मार्गदर्शन करणारा दिवा आहे. या दिव्याच्या प्रकाशात आपले जीवन उजळून टाकाअसे म्हटले.

या प्रसगी डॉ. कपूर कुटुंबातील विक्रमसिंह कपूर , वर्षा कपूर, श्रद्धा ताई चौहाण,अनितताई सादरे,हनुमान सदरे,श्रुती कपूर, पूर्वी कपूर, जागृती कपूर, व सर्व सदस्य, दुबे कॉलनीतील माता-भगिनी, तसेच लहान मुले उपस्थित होती. सर्वांनी हरिनाम गात भक्तीमय वातावरण निर्माण केले. कार्यक्रमात ज्ञानेश्वरी ग्रंथ घराघरांत पोहोचविण्याच्या या उपक्रमाचे महत्त्व आणि उद्दिष्ट याविषयीही चर्चा झाली.

कार्यक्रमाची सांगता 'पसायदान' पठणाने झाली. जे सुकृत आहे त्याची फळे लाभोत, सर्व लोक सुखी होवोत असा मंगल संकल्प व्यक्त करण्यात आला.

शेवटी दैनिक चंपावती पत्रचे महादेव नाना साळुंके यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी या कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करत ज्ञानेश्वरी घरपोच ग्रंथ भेट हा उपक्रम प्रचार आणि प्रसार ,समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी राबविण्यात येत असल्याचे सांगितले. त्यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून या उपक्रमाला पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमानंतर उपस्थित सर्वांनी प्रसादाचे सेवन करून भक्तिमय वातावरणात सोहळ्याची सांगता झाली.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### निवृत्ती वेतनधारक व कुटूबंनिवृत्ती धारकांनी ३० नोव्हेंबरपर्यत हयात प्रमाणपत्र सादर करावे

**बीड ।** प्रतिनिधी

बीड जिल्हा कोषागार अंतर्गत निवृत्ती वेतन घेणारे निवृत्ती वेतन धारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयात असल्याबाबत दाखला सादर करण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे. हयात असल्याबाबतचा दाखला नोंदविण्यासाठी बँकेत हयात दाखला यादी पाठविण्यात आलेली आहे. राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांनी न चुकता बॅकेत जाऊन सदर यादीमध्ये आपल्या नावापुढे स्वाक्षरी करुन किंवा अंगठयाचा ठसा उमटवून हयातीचा दाखला सादर करावा. जीवन प्रमाण या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन पध्दतीने देखील हयात दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा राजपत्रित अधिका-याच्या समक्ष स्वाक्षरी करुन जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल. निवृत्ती वेतनधारक काही कामानिमित्त परदेशात असल्यास तेथील भारतीय राजदुतामार्फत हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल.

### फार्मसी कॉलेज मध्ये तणावमुक्त जीवनासाठी तणाव व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न



**आष्टी ।** प्रतिनिधी

आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च, आष्टी (डी फार्मसी,बी फार्मसी, एम फार्मसी) या औषधनिर्माण फार्मसी कॉलेजमध्ये १० नोव्हेंबर २०२५ रोजी 'तणाव व्यवस्थापन' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये प्राध्यापक गिरीश कुकरेजा सर बौद्धिकक्षमता कौशल्य प्रशिक्षक विज्ञान संवादक हे व्याख्याते म्हणून होते. माझा ताण-तणाव ही माझी निर्मिती आहे हे समजून घेणे हेच तणाव व्यवस्थापनाचे पहिले पाऊल आहे. तणाव म्हणजे काय, अभ्यास करताना किंवा इतर गोष्टीमुळे तणाव कसा निर्माण होतो आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्या पद्धती अवलंबाव्यात,याबद्दल त्यांनी माहिती दिली. आजच्या आधुनिक जगात आव्हाने शारीरिक पातळीपेक्षा बौद्धिक आणि भावनिक पातळीवर जास्त आहेत. त्यामुळे भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी स्वतःवर नियंत्रण ठेवणे हाच सर्वोत्तम उपाय आहे. जीवनात येणाऱ्या समस्या व अडचणी कशा दूर करता येतील याविषयी मार्गदर्शन केले, विद्यार्थ्यांशी हितगुज करून, प्रश्नोत्तर स्वरुपात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, ताण-तणाव- नैराश्य यामुळे टोकाचा निर्णय न घेता, सदर समस्या हसत-खेळत मित्र-मैत्रिणींशी चर्चा करून आपल्यापेक्षा मोठ्या व्यक्तींशी विचार विनिमय करून समस्येवर योग्य तो निर्णय घेऊन समस्या सोडवावी , आई वडिलांचे, शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे जेणेकरून ताण-तणाव मुक्त आयुष्य जगता येईल, यासाठी प्रयत्न करावेत, असे मार्गदर्शन व्याख्याते प्रा. गिरीश कुकरेजा यांनी केले. कॉलेजमधील सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन केल्यामुळे कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनी प्रा.कुकरेजा सरांचे आभार मानले.

### भाविकांच्या मनोभावे सेवेतून नांदेडच्या सारथी प्रतिष्ठानचे कपिलधारमध्ये अहोरात्र कार्य



**बीड ।** प्रतिनिधी

सामाजिक बांधीलकी आणि सेवा भावना जपणार्या सारथी प्रतिष्ठान, नांदेड तर्फे श्रीक्षेत्र कपिलधार यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सेवेसाठी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रतिष्ठानचे यंदाचे २० वे वर्ष असल्याने, ४ आणि ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सलग दोन दिवस महाप्रसाद, मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर, रक्तदान शिबिर आणि स्वच्छता अभियान अशा बहुआयामी सामाजिक सेवाकार्यांनी यात्रास्थळ सेवाभावी उपक्रमांनी भरभरून गेले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध राज्यांतून कपिलधार येथे येणार्या यात्रेकरू, भक्त आणि भाविकांना शुद्ध पाणी, विश्रांती सुविधा आणि महाप्रसादाची व्यवस्था सारथी प्रतिष्ठानने मनापासून केली. यात्रेकरूंच्या सोयीसाठी प्रतिष्ठानच्या स्वयंसेवकांनी अहोरात्र परिश्रम घेत भाविकांना प्रत्यक्ष सेवाभाव अनुभवायला लावला. भाविकांच्या सेवेतच भगवंताचे दर्शन या तत्वाचा प्रत्यय या उपक्रमातून प्रकर्षाने जाणवला. उपक्रमांना डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांचे आशीर्वाद लाभले. तसेच श्री ष.ब्र. दिगंबर शिवाचार्य महाराज, थोरला मठ, वसमत यांच्या शुभहस्ते सर्व सामाजिक उपक्रमांचे उद्घाटन संपन्न झाले. आरोग्य शिबिरात डॉ. महेश खेंगटे, डॉ. भुजंगराव पन्नासे, डॉ. प्रकाश सुपेकर, डॉ. त्र्यंबक स्वामी, डॉ. सुदर्शन शिंदे यांसह विविध तज्ज्ञ डॉक्टर्सनी आपली मौल्यवान सेवा दिली. रक्तदान शिबिराला तरुण मंडळींसह विविध वयोगटातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रक्तदान शिबीरात १५२ दात्यांनी स्वयंस्फुर्तीने रक्तदान केले. कपीलधार परिसर सदैव स्वच्छ व सुंदर राहावा यासाठी प्रतिष्ठानच्या स्वयंसेवकांकडून स्वच्छता अभियान राबवण्यात आले, ज्याचे यात्रेकरूंनी विशेष कौतुक केले.

### आनंदऋषीजी हॉस्पिटल, बीड येथे आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर

**बीड ।** प्रतिनिधी

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने आणि संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली, जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेजवळ, बीड येथे रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये मनके व सांधे बदली, गुडघेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी अशा अस्थिरोगांवर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महागड्या वैद्यकीय सेवेमुळे सर्वसामान्य रुग्णांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता अत्यल्प दरात उच्च दर्जाची सेवा देण्याचा उद्देश या शिबीरामागे आहे. या शिबिरात संपूर्ण गुडघा व खुबा प्रत्यारोपण अवघ्या ६५,००० मध्ये गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह उपलब्ध असणार आहे. तसेच, 'महा फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया देखील केली जाणार आहे. याशिवाय, जे रुग्ण या योजनेसाठी पात्र नाहीत, त्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत उपचार मिळवून देण्यात येणार आहेत. प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. रोहन धोत्रे (अहमदनगर) व त्यांच्या सहकारी तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. तपासणीसाठी नोंदणी शुल्क फक्त १०० असून, इच्छुकांनी मो. ८२६२००९०९१ / ९८५००७७३६१ या क्रमांकावर संपर्क साधावा. वेळेअभावी नोंदणी न करता आलेल्या रुग्णांचीही तपासणी करण्यात येणार आहे.

## गेवराई शहराच्या सर्वांगीन विकासासाठी माझ्या पदरात मतांचा आशिर्वाद द्या: सौ. शितलताई दाभाडे

**गेवराई ।** प्रतिनिधी

विकासाचा ध्यास असणारे आमचे नेते अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ.विजयसिंह पंडित यांनी कोट्यवधी रुपयांची विकासकामे आणली आहेत, ती दर्जेदार झाली पाहिजेत यासाठी नगर परिषदेची सत्ता आपल्या हाती असते गरजेचे आहे. गेवराई शहराच्या सर्वांगीन विकासासाठी माझ्या पदरात मतांचा आशिर्वाद द्या असे भावनिक आवाहन सौराष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे यांनी केले. गेवराई शहरातील मतदारांच्या गाठीभेटी दरम्यान त्या बोलत होत्या.

गेवराई नगरपरिषद निवडणुकी मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई महेश दाभाडे यांच्या प्रचारार्थ संजय नगर येथील सय्यद रफिक भाई यांच्या निवासस्थानी कॉर्नर बैठकीत बोलताना त्या पुढे म्हणाल्या की सर्वसामान्य मतदारांना योग्य तो न्याय देण्यासाठी



व त्यांच्या असणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी माझ्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तिमत्त्वाला संधी द्या गेवराई शहराच्या प्रत्येक प्रभागांमध्ये चांगल्या दर्जाचे रस्ते व नाली बांधकाम व दिवाबत्ती यांची योग्य सोय सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून दिली जाईल. प्रत्येक प्रभागांमध्ये वयोवृद्धांना ओपन स्पेस मध्ये बसण्यासाठी आसन व्यवस्था लहान लहान बालकांना विविध खेळ खेळण्यासाठी मैदाने उपलब्ध करून दिली जातील त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ या चिन्हावर मताचे दान द्या असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला प्रदेशाध्यक्ष मुक्ताताई आर्दड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडी शहर अध्यक्षा पल्लवी ताई गोगुले, वैष्णवी दाभाडे,सय्यद रुकसाना, सय्यद जेबुनिसा, बिल्कीस बानो, सय्यद नगमा, माधूरी बांडे, नसरीन हरभट,

▶▶ उर्वरित पान २ वर

## अ‍ॅड. बापूसाहेब जाधव यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेना जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**बीड ।** प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्यनेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या सूचनेवरून आणि माध्यमातून अ‍ॅड. श्री. बापूसाहेब विठ्ठलराव जाधव यांची शिवसेना



प्रणित शेतकरी सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काल, दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे नगर पालिका इच्छुक उमेदवारांच्या मुलाखत सत्र कार्यक्रमात जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी अ‍ॅड. जाधव यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. अ‍ॅड. बापूसाहेब जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक आणि जनसंपर्क कार्यात सक्रिय असून त्यांनी समाजसेवक म्हणून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले

▶▶ उर्वरित पान २ वर

## शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सोमवारी शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा

**शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : जिल्हाध्यक्ष डावकर**

**बीड ।** प्रतिनिधी

माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या न्याय मागण्यासंदर्भात तात्काळ बैठक बोलावून संघटना पदाधिकार्यांच्या समवेत चर्चा घडवून मागण्या सोडवण्यात याव्यात अन्यथा शिक्षकेत्तरांच्या मागण्यासाठी महामंडळाचे सरकार्यवाहक शिवाजी खांडेकर यांच्या नेतृत्वात सोमवार दि.१७ नोव्हेंबर रोजी पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्यापासून शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे असा इशारा माध्यमिक शिक्षकेत्तर संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

राज्यातील माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. न्यायालयीन आदेशानुसार सुरू करण्यात आलेली शिक्षकेत्तर कर्मचार्यांची पदभरती देखील शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून बंद केलेली आहे. सदर पदभरती तात्काळ सुरू करण्यात यावी. चतुर्थश्रेणी कर्मचार्यांना २४ वर्षानंतर

▶▶ उर्वरित पान २ वर

## कुत्र्यांच्या हल्ल्यात काळवीट ठार

**वनविभागाच्या अधिकाऱ्यांना फोन घ्यायला वेळ नाही : डॉ. गणेश ढवळे**



**लिंबागणेश ।** प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावरील महाजनवाडी शिवारातील वनपरिसरात आज बुधवार (दि.१२) सकाळी सुमारास काळवीट मृतावस्थेत आढळून आले. काळवीटाच्या शरीरावर इतरत्र कुठेही गंभीर जखमा नसल्याचे दिसून आले, मात्र पोटाचा भाग छिन्नविछिन्न अवस्थेत असल्याने भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड पोलीस दलाकडून जिल्हाभरात विशेष मोहीम ; लाखोंचा दंड वसूल

**बीड ।** प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांचे संकल्पनेतून व जिल्हा वाहतुक शाखा बीड यांचे समन्वयातून बेशिस्त वाहन चालकांवर नियंत्रण व वाहतूक नियमन करण्यासाठी बीड जिल्ह्यातील पाडळशिंगी टोलनाका, बार्शी नाका बीड, साठे चौक वडवणी, केज टोल नाका, चुंभळी फाटा पाटोदा, गोमाळवाडा



फाटा शिरूर, धारुर टोल नाका, बर्दापूर टोल नाका, परभणी टी पॉईंट माजलगाव, ईटके कॉर्नर परळी,

▶▶ उर्वरित पान २ वर

## उद्योगपती सरपंच परिवंत गायकवाड महाराष्ट्र भुषण राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानीत

**आष्टी ।** प्रतिनिधी

तालुक्यातील आदर्श गाव कऱ्हेवडगावचे सरपंच, उद्योगपती परिवंत गायकवाड यांना अलिकडेच महाराष्ट्र भुषण आदर्श सरपंच राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर झाला होता. सातारा जिल्ह्यातील खटाल तालुक्यातील वडूज येथे रविवार दि.८ नोव्हेंबर रोजी ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते सरपंच परिवंत उत्तम गायकवाड यांना पुरस्कार प्रदान



करुन सन्मानीत करण्यात आला. कऱ्हेवडगाव या छोट्या गावाला हा मोठा सन्मान मिळाला आहे. कऱ्हेवडगाव गावचे कार्यतत्पर आणि समाजसेवेचा वसा घेतलेले सरपंच परिवंत उत्तम गायकवाड यांना महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार देण्यात आला आहे. या गौरवामुळे केवळ कऱ्हेवडगावच नव्हे तर संपूर्ण आष्टी तालुक्याची मान उंचावली आहे. कोरोना काळात जेव्हा सर्वत्र भय आणि अनिश्चिततेचे वातावरण होते तेव्हा सरपंच परिवंत गायकवाड यांनी 'सेवा हीच श्रद्धा 'या भावनेतून ग्रामस्थांना किराणा किट, मास्क व सॅनिटायझरचे वाटप करून मानवता जापली

▶▶ उर्वरित पान २ वर



*केज : जिवाचिवाडी येथिल श्रीराम प्रल्हाद चौरे यांचा लाईटचा शॉक लागून दूर्दवी मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर निर्माण झाला होता. यावेळी विडा गटाचे माजी लोकप्रिय जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे यांच्याकडून कुटूंबियांना तीस हजारांची मदत करण्यात आली.*

## न.प. निवडणुकीतच भाजपच्या नौकेला पाडलं भोक

**अशोक लोढांच धार्मिक गोष्टीत नाक खूपसून दिसलं माणुस की धरून ठोक**

**● बीड शहर ठाण्यात गुन्हा दाखल**

**बीड ।** प्रतिनिधी



शांतीचा संदेश देत जिवो जीवस्य जीवनम् म्हणजेच मानवी जीवनात समानता, सहाय्य आणि परस्पर आदराचे महत्त्व शिकवत सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या जैन धर्मगुरू समोरच भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी गुंडगिरी करत एकाला मारहाण केल्याची खळबळ जनक घटना घडली याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न.प.निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच भाजप शहराध्यक्षांने धार्मिक कार्यक्रमात घातलेल्या धुडगुसामूळे चर्चे ला उधाण आले आहे.

सत्ता, पद, पैसा आला की माणूस किती मस्तवाल होतो. याची प्रचिती आज आली गेली. जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या जैन धर्मगुरूंचा प्रवचन कार्यक्रम बीड शहरात सध्या सुरू आहे. मंगळवार दि ११ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास फुलाई नगर भागात जैन मुनिं च्या प्रवचन कार्यक्रमास जवळपास ५० ते ६० लोकांनी हजेरी लावली होती. कार्यक्रम मंगलमय वातावरणात शांततेत सुरू होता. एका संस्थेच्या माध्यमातून गरीब व गरजू व्यक्तींना मदत करण्याच्या कामासंदर्भात चर्चा सुरू झाली.या कार्यक्रमाला भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा देखील उपस्थित होते.यावेळी अशोक लोढा यांचा कुठलाही संबंध नसताना तुम्ही फार मोठे लागून गेला का? तुम्ही लोकांना मदत काय करता? यासारखे प्रश्न उपस्थित करून अरेरावी ची भाषा वापरण्यास सुरुवात केली. यावेळी जितेंद्र सुखराज बोरा वय ५० वर्ष व्यवसाय व्यापारी रा. सारडा रेसिडेन्सी यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. धार्मिक कार्यक्रमात असा मारहाणी सारखा प्रकार नको कार्यक्रम शांततेत व्हावा यासाठी म्हणून जितेंद्र बोरा यांचे मोठे बंधू पारस बोरा हे देखील हस्तक्षेप केला. पारस बोरा यांना देखील ढकलून देत जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. याप्रकरणी जितेंद्र बोरा यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर